# फॅशन्स :

## आजच्या तरुण मुलामुलींपुढील गहन प्रश्न

**फॅशन्स् कराव्यात की करू नये ? सौंदर्य रसिकपणे अनुभवावे, जपावे, वाढवावे की नाही ? जरूर करावे. फॅशन्स्हीं कराव्यात. आज मात्र अनेक ~~पातळीवर विषमता असताना,~~ जुनी मूल्ये कायम असताना खऱ्या अर्थाने कोणताही 'ड्रेस', कोणतीही फॅशन आपण निखळ सौंदर्यशास्त्राच्या आधारे तपासू शकू की नाही व त्यातील निखळ सौंदर्य पाहू शकू की नाही याची शंका वाटते.**

---

पुण्यात 'सत्यम्–शिवम्–सुन्दरम्' चित्रपटातील झीनत अमानच्या अर्धनग्न शरीरप्रदर्शनाविरुद्ध मोर्चा झाला आणि त्या निमित्ताने चर्चेचा गदारोळ उडाला. अनेक लोकांच्या अनेक प्रतिक्रिया होत्या. पुण्यात केले गेलेले निदर्शन नक्की कशासाठी होते, याचा बोध अजूनही कित्येकांना झाला नाही. याचे उदाहरण परवा पहायला मिळाले.

मुंबईच्या जी. एस्. मेडिकल कॉलेजमध्ये 'मुक्तांगण' या व्यासपीठावर बोलण्यासाठी व चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मला बोलवण्यात आले होते. मुली अभावाने तळपत होत्या. अर्थात् हे व्यासपीठ नव्यानेच सुरू झाले होते.

### सार्वजनिक टीका का ?

सुरवातीला पंधरा–वीस मिनिटे बोलून मी माझी भूमिका मांडली आणि मग चर्चेला जोर चढला. तऱ्हेतऱ्हेचे लोक होते. उदारमतवादी होते. तसेच अगदी परंपरागतिक भूमिका घेणारेही होते. तरुण मुलांना विशेषत: हा विषय फारच आव्हानात्मक होता. सगळ्यात शेवटी चर्चा 'फॅशन्स' वर येऊन स्थिरावली. त्या संदर्भात मी त्यांना पुण्याच्या मोर्चाची माहिती दिली. त्यांच्यापैकी काही जणांनी माणूसमधील मोर्चाचा रिपोर्ट वाचला होता. तसेच त्यावर झालेला पत्रव्यवहारसुद्धा वाचला होता.

सुरवातीचा मुद्दा होता,– फॅशन्स करण्यात काय चूक आहे ! सौंदर्याचे आकर्षण प्रत्येकाला असतंच.

दुसरा मुद्दा होता एका उदारमतवाल्याचा– झीनत अमानच्या अर्धनग्न शरीर दाखविणाऱ्या फॅशन्स या कलात्मक नव्हत्या असे फारतर म्हणता येईल. पण तिच्या फॅशन्सवर सार्वजनिक टीका करण्याची गरज काय ?

तिसरा म्हणाला की, तुम्ही स्वत:ला बंडखोर म्हणता आणि जुन्या पारंपारीक श्रद्धा, समजुती यांचा निषेध करता. तुमच्यासारख्या पुरोगामी लोकांना अशा आधुनिक फॅशन्सचा का राग यावा ?

चौथ्याचा मुद्दा व्यक्तीस्वातंत्र्याचा होता. त्याचे म्हणणे– जोपर्यंत आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कोणत्याही जबरदस्तीखाली झीनतला तशा प्रकारचे अर्धनग्न शरीर दाखविणे भाग पडले नाही, तोपर्यंत आपण त्याची दखल कशाला घ्यायची ? या समाजामध्ये कोणालाही काही विकण्याचा अधिकार आहे. राजकपूरने तिला पैसे दिले आणि त्याच्या बदल्यात तिने स्वखुषीने तशा प्रकारे अर्धनग्न शरीर दाखविणारे

नाही स्वतःच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ करण्यास तिला पुरेसा वेळ नसतो. घराबाहेर काम करीत असतानाही कौटंबिक अडचणींचे तिच्या मनावर सतत दडपण राहाते. त्यामुळे आपल्या कामावर तिचे लक्ष केंद्रित होत नाही. कौटुंबिक गोष्टींसाठी तिला वारंवार रजा घ्यावी लागते. घरचा व बाहेरचा ताण सहन न झाल्याने अनेक स्त्रियांची प्रकृती बिघडते. म्हणून विशेष जबाबदारीची कामे पत्करण्यास त्या उत्सुक नसतात. म्हणून काही अविवाहीत प्रौढ कुमारिका वगळल्या तर स्त्रिया आपल्या व्यावसायात शिखरस्थानी पोहोचू शकत नाहीत. व्यवसायातील भरभराटीसाठी स्त्रियांना आपल्या नैसर्गिक प्रेरणांचा त्याग करणे भाग पडावे हेच त्यांच्या परवशतेचे लक्षण होय.

## कायद्याचे संरक्षण

अर्थाजन करणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया शेती व लघु-उद्योग यांतच गुंतलेल्या आहेत. असे उद्योग विस्तीर्ण क्षेत्रावर पसरलेले असतात. शिवाय प्रत्येक ठिकाणी मालकमजूर संबंध वेगवेगळ्या प्रकारचे असतात. अशा उद्योगात कामगारसंघटना स्थापन करणे फार अवघड असते. शिवाय अत्यंत कष्टाच्या व कमी मजुरीच्या या व्यवसायात फक्त स्त्रियाच प्रवेश करतात. मालकाशी झगडा करण्याची त्यांच्यामध्ये ताकद नसते. कुटुंबात सतत दडपणाखाली वाढल्या-मुळे स्वतःच्या हक्कासाठी झगडा करण्याची प्रवृत्ती त्याच्यामध्य लवकर तयार होत नाही. बाहरच काम आटोपल्यावर त्यांची घरकामाची दुसरी पाळी सुरू होत असल्याने संघटनेच्या कार्यात भाग घेण्यास त्यांना सवड नसते. त्यामुळे स्त्रिया बहुसंख्येने असलेल्या व्यवसायात ट्रेड युनियन संघटना सहसा उभ्या रहात नाहीत. या लघुउद्योगांमध्ये स्त्रियांची मोठ्या प्रमाणावर पिळवणक होते म्हणून स्त्रियांच्या संरक्षणासाठी कामाचे तास, वेळ, जागा, प्रसूतीची रजा, पाळणाघराची सोय, इत्यादी निश्चित करणारे कायदे शासनाने मंजूर केले. परंतु अशा कायद्यामुळे मालकाचा स्त्रीकामगारांवरील खर्च वाढत जातो, स्त्रीकामगारांच्या संख्येत कपात होते आणि स्त्रियांच्या बेकारीची समस्या अधिकच गंभीर बनते. त्यामधून पिळवणूक की बेकारी असा नवा पेच स्त्रियांसमोर उभा रहातो. स्त्री कामगारसंरक्षक कायद्यांनी स्त्रियांच्या बेकारीत भर पडत असल्याने स्त्रियांनी कायद्याचे संरक्षण मागू नये अशा निष्कर्षाप्रत पाश्चत्य देशातील अनेक स्त्रीसंघटना येऊन पोहोचल्या आहेत.

## राजकीये क्षेत्रातील पिछेहाट

आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांच्या या परिस्थितीमुळे इतर क्षेत्रातही हळूहळू त्यांची पिछेहाट होत आहे. भारतीय प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर १९५२ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे लोकादरास पात्र झालेल्या अनेक महिला निरनिराळ्या पक्षांनी आपल्या उमेदवार म्हणून उभ्या केल्या आणि त्यातील अनेक स्त्रिया विधीमंडळातही निवडून आल्या. गांधीजींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या स्वातंत्र्य चळवळीत विद्वत्तेपेक्षा कृतीला, प्रतिष्ठेपेक्षा चारित्र्याला, पैशा पेक्षा त्यागाला अधिक महत्त्व होते. त्यामुळे शिक्षण आणि संपत्ती यापैकी कशाचेही पाठ-बळ नसलेल्या काही स्त्रिया समाजसेवेच्या मार्गाने राजकारणात पुढे आल्या. स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुकात या जुन्या कार्यकर्त्यांचा मान राखला गेला. संसदीय लोकशाही येथे स्थिरस्थावर झाल्यावर राजकारणात त्याग, सेवा, चारित्र्य यांचे महत्त्व हळू हळू कमी होत गेले. लोकप्रतिनिधींनी निरनिराळ्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व व संरक्षण करावे अशी अपेक्षा निर्माण झाली. तेव्हा संपत्ती, सत्ता आणि संघटना या सर्व दृष्टीनी दुर्बळ असणाऱ्या स्त्रिया विधीमंडळात प्रवेश करण्यास असमर्थ ठरल्या. स्त्री-पुरुषांमधील साक्षरतेत व शैक्षणिक संधीतही अद्याप फार मोठी तफावत आहे. स्त्रियांच्या खालावणाऱ्या परिस्थितीचे प्रमुख गमक भारताच्या लोकसंख्येतील त्यांचे घटणारे प्रमाण होय. १९०१च्या शिरगणतीप्रमाणे स्त्रियांचे प्रमाण दर हजार पुरुषामागे ९७२ असे होते. १९७१ मध्ये ते १०००:९३० इतके घसरले. आर्थिक, राजकीय व शैक्षणिक अशा सर्वच आघाड्यांवर स्त्रियांची होत जाणारी ही पीछेहाट पाहिली म्हणजे भारतीय राज्यघटनेने दिलेले स्त्रीपुरुषांच्या समानतेचे आश्वासन केवळ कागदोपत्रीच राहाणार की काय अशी भीती वाटल्यावाचून राहात नाही.

प्रा. नलिनी पंडित, मुंबई

कपडे घातले. ती काही कुक्कुले बाळ नव्हे. तिला ती फॅशन्स आवडली. लोकांना आवडले तर तिला त्यांनी बघावे, नाहीतर बघू नये. तुम्ही तिच्या फॅशनवर टीका का करता ?

एका मुलाने तर यावर कुरघोडी केली. त्याचे म्हणणे,– 'तुमचा नग्नतेवरच आक्षेप आहे नं, मग तुम्ही 'मृगया' नावाच्या चित्रपटातील मिथुन चक्रवर्तीच्या कपड्यांवर का नाही टीका करत ? तो तर अगदी आखूड धोतर नेसून वावरतो सिनेमाभर. अंगावर काहीही नसते.

## विकृत चित्रण

अशारीतीने प्रश्नांचा भडीमार होऊन मला आव्हान केले गेले. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्या. बरं गंमत अशी की, 'सत्यं, शिवं, सुंदरं' हा चित्रपट आमच्या वादविवादाचा विषय नव्हता. तो कलात्मक आहे की नाही, झीनत अमान जशी ग्रामीण तरुणी म्हणून दाखविली आहे तशी ग्रामीण तरुणी असते का ? ती तशा प्रकारचे कपडे घालते का ? तसे पाहिले तर भारतातील सगळेच चित्रपट अनेक चुकीच्या गोष्टी दाखवत असतात. मग केवळ झीनत अमानने रंगवलेल्या ग्रामीण स्त्रीवरच टीका का ? अगदी अंग भरून कपडे घातलेली वंजारी स्त्री दाखविली तरी तिचे अंगविक्षेप, तिच्या तोंडी असलेले संवाद सर्वस्व अकलात्मक व काही वेळा चक्क विकृतही असते. तेव्हा ग्रामीण स्त्री अनावृत्त रंगविली म्हणून राजकपूरचा व अशी परवानगी दिली म्हणून झीनत अमानचा निषेध करणे हाही मुद्दा तेथे पुढे आणण्यात अर्थ नव्हता. त्यातून तात्पर्य काढायचे होते ते आजच्या समाजामध्ये कपड्यांच्या फॅशन्स कशारीतीने पुढे येत आहेत, वापरल्या जात आहेत व त्यामध्ये काय चुकीचे आहे यासंबंधी. सुरवात झीनत अमानने घातलेल्या कपड्यांपासून करायची होती.

## मी संस्कृति संरक्षक नाही !

माझी भूमिका अशी होती.—

मला संस्कृतीसंरक्षकाची भूमिका घ्यायची नाही. झीनत अमानचे कपडे अश्लील होते व त्यामुळे लैंगिक भावना जागृत होतात. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्री ही मांगल्याची, शालिनतेची देवता आहे. अशा स्त्रीला अशाप्रकर अनावृत्त दाखविणे हा भारतीय संस्कृतीचा अपमान आहे. अशा प्रकारची दांभिक भूमिकाही मला घ्यायची नाही. कारण भारतीय संस्कृतीतील स्त्रीला मिळणारी वागणूक कशी दुय्यम असते आणि प्रत्यक्षात स्त्रीशरीर हे पुरुषाच्या वासनेची शिकार म्हणून कसे वापरले जाते हे आपण पहात असतो.

तसेच पडद्यावर नग्नता दाखविली म्हणजे भयंकर हाहा:कार उडतो असे मला वाटत नाही. केवळ नग्न शरीर पाहून वासनांना आवाहन होत नाही, असे मानसशास्त्रज्ञ सांगतात. कलात्मक आविष्काराचा भाग म्हणून कलाकृतीमध्ये नग्नता आली, सर्व आशयामध्ये दाखवले जाणारे नग्न शरीर चपखल बसत असले तर अशा नग्नतेचा परिणाम लैंगिक भावना प्रक्षुब्ध करण्यास होत नाही. कपड्यांमधून दिसणारं अर्धनग्न शरीर चांगले की वाईट ह्यासंबंधीचे रिवाज वेगवेगळ्या समाजात वेगवेगळे असतात. एखाद्या जंगलात रहाणाऱ्या टोळी समाजात नग्नता किंवा अर्धनग्नता ही जीवन पद्धतीच असेल तर आजच्या भारतीय समाजामध्ये त्यामुळे फार खळबळ उडेल. समाजाच्या अवस्था बदलतात, तसतशा संकल्पना बदलतात, प्रतिमा बदलतात, स्वरुपे बदलतात. आज समाजायध्ये स्त्री देहाकडे संभोगाची वस्तू म्हणून पहाण्याचा दृष्टीकोन बरीच वर्षे चालत आलेला आहे. अशा परिस्थितीत अनावृत्त स्त्री शरीर जर चुकीच्या पद्धतीने पुढे आले तर त्या शरीराकडे बघण्याचा दृष्टीकोन हा निर्मळ सौंदर्याकडे बघण्याचा रहाणे शक्य नाही. कारण स्त्रीची प्रतिमा आज तशी तयार झालेली आहे.

## क्रयवस्तूमध्ये रुपांतर

झीनत अमानच्या अर्धनग्न फॅशन्सबद्दल माझे आक्षेप दोन प्रकारचे आहेत.–

प्रथम मला कोणत्याही वस्तूचे, तसेच कोणत्याही व्यक्तीचे रुपांतर क्रयवस्तूमध्ये होणे चुकीचे वाटते. म्हणजे काय ? मला आजच्या भांडवलशाही समाजामध्ये निर्माण होऊ शकणारी 'बाजार पेठ' ही संस्थास

चुकीची वाटते. या बाजारपेठेमुळे प्रत्येक वस्तू, माणसाची कोणतीही क्षमता, माणसाचा गुण विक्रीयोग्य वस्तू बनतो, विकला जातो. प्रत्येक गोष्टीची विक्री होत असल्यामुळे माणूस माणूसकी राखू शकत नाही. स्वतःचे वेगळे खास व्यक्तिमत्व घडवू शकत नाही. जे बाजारात विकले जाईल, ज्याला किंमत येईल, अशाच प्रकारचे गुण, अशाच प्रकारच्या क्षमता त्याला ठेवाव्या लागतात आणि या सर्वांचा परिणाम होऊन त्याचे व्यक्तिमत्व घडविले जाते. माणूस असून तो माणूसकी विसरतो. पैसे मिळविण्यासाठी, पोट भरण्यासाठी त्याला बाजारात जावेच लागते आणि इच्छा असो वा नसो त्याचे गुण त्याला हवे तसे तो वापरू शकत नाही. जो त्याचे गुण विकत घेतो, ज्याच्या हातात पैसा असतो त्याच्या मर्जी-प्रमाणे त्याचे गुण वापरले जातात व लोकांनाही विकणारा जे विकेल तेच विकत घ्यावे लागते. वरील उदाहरणामध्ये राजकपूर पैसे देऊन झीनत अमानचे अभिनय कौशल्य हा गुण विकत घेत असतो. (तिच्याकडे अभिनय कौशल्य आहे की नाही शंकाच आहे.) मात्र 'अभिनय कौशल्य' 'या गोड नावाखाली तो तिचे सौंदर्यही विकत घेतो. बरं हे सौंदर्य म्हणजे सौंदर्य-शास्त्रातील अमूर्त कल्पना नव्हे. हे सौंदर्य म्हणजे येथे 'सुंदर स्त्री शरीर' राजकपूर विकत घेऊन पुन्हा लोकांना चित्रपटाच्या माध्यमाद्वारे विकतो. आणखी खोलवर तपासून पाहिले, तर लक्षात येईल की, येथे नुसते 'नग्न स्त्री शरीराचे सौंदर्य' विकले जात नसून येथे स्त्रीची 'लैंगिक प्रतिमा' विकली जात आहे. स्त्री शरीराकडे बघण्याचा दृष्टीकोन विकला जात आहे. स्त्री समाजामध्ये अनेक भूमिका बजावत असते. त्यापैकी एक भूमिका ही आज 'पुरुषाच्या वासना शमविणे' अशी मानली गेलेली आहे. ती आहे की नाही, ह्याचा शोध इतिहासातून घेऊ. अनेक रितीरिवाजातून घेऊ. आज प्रतिदिनी घडणाऱ्या घटनातून घेऊ. माझ्यामते आज स्त्रीकडे माता म्हणून पाहिले जाते, नवरा–मुले सर्वांची सेवाशुश्रुषा करणारी सेविका म्हणून पाहिले जाते, त्याचबरोबर पतीची शय्यासोबत करणे म्हणजेही सेवा करणे अशीही भावना दिली जाते. किंवा वेश्या होऊन समाजाची सेवा करणे अशीही तिची भूमिका मानली जाते. हे तिचे लिंगवैशिष्ठ्य समजले जाते. त्यात तिचे स्त्रीत्व साठलेले आहे असे मानले जाते. झीनत अमानच्या फॅशन्समुळे स्त्री म्हणजे पुरुषाच्या डोळ्यांना, शरीराला सुख देणारी, आकर्षित करणारी व्यक्ती अशा स्वरूपात ती पुढे येते. इतकेच नव्हे तर अतिशय तीव्रपणे, प्रकर्षाने तिचे स्त्री म्हणून शरीर-वैशिष्ठ्य जाणवेल, अशारीतीने ती पुढे यते. यामुळे तिच्या फॅशन्स या आक्षेपार्ह वाटतात.

## लोकमाध्यमातून पारंपारीक भूमिका

तुम्ही म्हणाल, आज समाजामध्ये सर्वचजण आपापल्या क्षमता व गुण विकतात. कोणी बुद्धीमत्ता विकतो, कोणी श्रम विकतात, कोणी गाण्याचा आवाज विकतात. ही विक्री मला चुकीचीच वाटते. या विक्रीबद्दल आवाज उठवून जेथे विक्री करावी लागणार नाही, अशा नवीन संस्था, असा नवा समाज निर्माण करण्याची आवश्यकता आहे. पण आपण चित्रपट धंद्यावर जरा नजर टाकू. आपल्याला असे दिसेल की, चित्रपटांमधून तर पारंपारीक स्त्री–पुरुष भूमिकांचे आणि प्रतिमांचे चित्रण मोठ्या प्रमाणावर चालते. थोडासा बदल काही वेळा दिसतो. कपड्यांमध्ये, व्यक्तीरेखांमध्ये. तो केवळ काळ बदलल्यामुळे स्त्री–पुरुषांच्या तात्कालिक प्रतिमा थोड्याफार बदलतात तेवढाच बदल असतो. पण नाहीतर खरं म्हणजे आज स्त्रीत्व आणि पुरुषत्व या दोन लिंगभेदावर आधारीत भूमिका पुन्हा पुन्हा दाखविल्या जातात आणि चित्रपट हे अतिशय सामर्थ्यवान लोकमाध्यम असल्यामुळे या माध्यमातून ही जुनी मूल्ये पुन्हा पुन्हा लोकांपर्यंत जात असल्याबद्दल व ती रुजायला मदत होत असल्याबद्दल काळजी वाटते. धर्मेंद्र बघा किंवा अमिताभ बच्चन बघा ! ते दोघे शौर्याचे पुतळे, स्त्रियांचे रक्षणकर्ते अशा पौरुषयुक्त भूमिका रंगवितात. पौरुष फक्त पुरुषातच असते. कर्तृत्व फक्त पुरुषातच असते, अशी मूल्ये पुढे आणतात आणि त्यांच्या कपड्यांच्या फॅशन्स अशा व्यक्तिरेखांना मदतकारक असतात. मिथुन चक्रवर्तीने 'मृगया' मध्ये नेसलेले आखूड धोतर या मूल्यांना पोषक नव्हते. ते त्या आदिवासी समाजाच्या गरीबीचे चिन्ह होते.

## स्त्रीचे शरीर : उपभोग्य वस्तू

झीनत अमानच्या फॅशन्सवर एवढी टीका होते आणि ते नजरेत भरून वादग्रस्त होतात, कारण तिचे कपडे पारंपारीक कल्पनांना धक्का देतात. त्यांना अश्लील वाटतात. कारण त्याच्या दांभिक कल्पनेप्रमाणे स्त्री मांगल्याची देवता असते. तिने अनावृत्त कसे व्हायचे ! त्यातही एखादी वेश्या, दुष्ट बाई असे कपडे घालून चालते. पण निरागस, चांगली तरुणी एवढ्या आखूड कपड्यात का ? पारंपारीक संवेदनांना ती धक्का देते. पण माझ्या मते ती स्त्री– भूमिकेतील एक पैलू, सर्वांत वाईट पैलू पोसण्यास मदत करते. पुरुषाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन– उपभोग्य वस्तू– स्त्री म्हणजे तिचा मेंदू नाही, तिचे बाकीचे गुण नाहीत, तर स्त्री म्हणजे तिचे शरीर, शरीरसुख घेण्यासाठी. फॅशन्समुळे अगदी दृश्य पातळीवर पहिल्या प्रथम व्यक्तीव्यक्तींमध्ये रेषा आखल्या जातात. लिंगभेदानुसार त्यांची वाटणी होते. त्यानंतर मग ती व्यक्ती तिची विशिष्ठ लैंगिक भूमिका नीटपणे बजावते की नाही, तिची वैशिष्ठ्ये काय आहेत याचा विचार होतो. फॅशन्समुळे वरवरच्या लैंगिक वैशिष्ठ्यांवर भर दिला जातो. बायकीपणा, पुरुषीपणा ह्या संबंधीची मूल्ये, कल्पना रुजवायला मदत होते.

## चळवळीवर आघात

आणि त्याचा परिणाम स्त्रियांच्या चळवळीवर वाईट तऱ्हेने होतो. रोजच्या जगण्यातून, आर्थिक, सामाजिक बदलातून स्त्रीचे मन घडत असते. विशेषतः तरुण मुला-मुलींची मानसिकता घडत असते. मूल्ये रुजत असतात. या नव्या भावनेला पोषक असे काही मिळण्याऐवजी उलट या लोकमाध्यमातून जुन्या कल्पना पसरविल्या जातात. फॅशन्स आदर्श म्हणून ठेवल्या जातात. यामुळे त्यांचे दृष्टीकोन नव्या तऱ्हेने घडू शकत नाहीत. स्वतःचा शोध त्यांना घेता येत नाही.

फॅशन्स कराव्यात की करू नये ? सौंदर्य रसिकपणे अनुभवावे, जपावे, वाढवावे की नाही ? जरुर करावे. फॅशन्सही कराव्यात. आज मात्र अनेक पातळीवर विषमता असताना, जुनी मूल्ये कायम असताना खऱ्या अर्थाने कोणताही 'ड्रेस', कोणतीही फॅशन आपण निखळ सौंदर्यशास्त्राच्या आधारे तपासू शकू की नाही याची शंका वाटते.

'ती फुलराणी' मधील फुलराणीच्या वडिलांचे एक वाक्य मला आठवतंय,–

'बाई कितीही नटली,

तरी हौस कोणाची फिटली !

आजचे नटणे, मुरडणे, फॅशन्स करणे यातून लैंगिक वैशिष्ठ्ये वापरून दुसऱ्या लिंगाच्या व्यक्तीला आकर्षित करणे एवढीच प्राथमिक जाणीव दाखविली जाते, एवढंच नव्हे तर लिंगविषयक भूमिकाही मूळ धरून रहातात, असे म्हणावे लागेल.

––छाया दातार

---

# पाऊस

आडाच पाणी पाणी
बाई खोलवर
हाताला आले फोड
शिंदू कुठवर
आला आला ग पाऊस
तरी जीव कासावीस
नदीला आला पूर
बाई दूरवर
पल्याड चांदीच्या ग धारा
माझ्या हाती दिल्या गारा
झीरपली गार गार
बाई झरझर
कुणी चेटूक ग केल
अस पाण्याला फीतवलं
उन्हात माझ घर
सार बाई करपल

— दया पवार